Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education, S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.नं. ८३२–ए, फा. प्लॉट नं. १७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आगारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे–४११००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000 &
Email : secretary.stateboard@gmail.com

परीक्षा प्राधान्य/महत्वाचे

क्र. रा.मं./परीक्षा–३/३६०२/४३७७
पुणे – ४११००४
दिनांक – २७/१०/२०२५
२८

प्रति,

विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे.

विषय – माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) फेब्रु–मार्च २०२६ परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन स्विकारण्याच्या तारखांबाबत

संदर्भ – १. रा.मं./ले–पे०६/परीक्षा शुल्क २०२५–२६/१४५४, दिनांक २४/०४/२०२५ रोजीचे पत्र.
२. क.रा.मं/परीक्षा–३/३१५६ दि. १२/०९/२०२५ रोजीचे पत्र.
३. क.रा.मं/परीक्षा–३/३३९० दि. ०३/१०/२०२५ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रु–मार्च २०२६ परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या नियमित विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे **UDISE + मधील PEN-ID** वरून ऑनलाईन पध्दतीने त्यांचे शाळा प्रमुखांमार्फत भरावयाची आहेत.

तसेच पुनर्परिक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (Private Candidate), श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) चे विषय घेऊन प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे त्यांचे शाळा प्रमुखांमार्फत प्रचलित पध्दतीने भरावयाची आहेत. सदरची आवेदनपत्रे **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने विलंब शुल्कासह भरावयाच्या तारखांचा तपशील पुढीलप्रमाणे--

शुल्क प्रकार	आवेदनपत्र भरावयाच्या तारखा	नियमित व विलंब शुल्काने आवेदनपत्र भरलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क RTGS/NEFT द्वारे भरणा करावयाचा कालावधी	माध्यमिक शाळांनी RTGS/NEFT ची पावती/चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रिलिस्ट विभागीय मंडळाकडे जमा करावयाची तारीख
विलंब शुल्क	मंगळवार, दि. २८/१०/२०२५ ते सोमवार, दि. १०/११/२०२५	मंगळवार, दि. २८/१०/२०२५ ते शुक्रवार, दि. १४/११/२०२५	सोमवार दि. १७/११/२०२५

सर्व माध्यमिक शाळांनी आवेदनपत्रे भरण्यापूर्वी School Profile मध्ये शाळा, संस्था, मान्यताप्राप्त विषय, शिक्षक याबाबतची योग्य माहिती भरुन मंडळाकडे पाठविणे आवश्यक आहे. सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरुन SUBMIT केल्यानंतर आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये माध्यमिक शाळांच्या लॉगिन (School Login) मधून Pre-List उपलब्ध करुन दिलेली असेल. माध्यमिक शाळांनी त्याची प्रिंट काढून विद्यार्थ्यांमार्फत आवेदनपत्रात नमूद केलेली सर्व माहिती जनरल रजिस्टरनुसार पडताळून ती अचूक असल्याची खात्री करावी. सदर प्रिलिम्सवर माहितीची खात्री केल्याबाबत संबंधित विद्यार्थ्यांनी स्वाक्षरी घ्यावी. त्याचप्रमाणे पडताळणी केलेबाबत मुख्याध्यापक यांनी प्रिलिम्सच्या प्रत्येक पानावर शिक्क्यासह स्वाक्षरी करावी.

इ. १० वी परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या माध्यमिक शाळेमार्फत भरावी. सर्व माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्त्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे –

१ माध्यमिक शाळांनी नियमित विद्यार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्रे स्विकारण्यासाठी **UDISE + मधील PEN-ID** मध्ये विद्यार्थ्यांची अद्ययावत नोंद असणे आवश्यक आहे व सदर **UDISE + मधील PEN-ID** वरुन नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरण्याची सोय उपलब्ध करुन दिलेली आहे.

२ पुनर्परिक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (Private Candidate). श्रेणीसुधार व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ट होणारे विद्यार्थी. ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) विद्यार्थी यांनी माहिती **UDISE +** मध्ये नसल्याने सदर विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीने निश्चित केलेल्या तारखांना ऑनलाईन पध्दतीने भरावयाची आहेत.

३ ज्या विद्यार्थ्यांचा APPAR-ID उपलब्ध आहे त्याची नोंद आवेदनपत्र भरताना करण्यात यावी.

४ सर्व माध्यमिक शाळांनी Website द्वारे प्राप्त Online चलनावर नमूद केलेल्या ICICI बँकेच्या Virtual Account मध्ये कोणत्याही बँकेमधून RTGS/NEFT द्वारे चलनाप्रमाणे अचूक शुल्क रकमेचा भरणा करण्यात यावा व चलनाची प्रत व Pre-list विहित मुदतीमध्ये विभागीय मंडळास जमा करावी. **रक्कम जमा केल्यानंतर त्या चलनामध्ये समाविष्ट सर्व विद्यार्थ्यांच्या application status मध्ये "Draft" to "Send to Board" व Payment status मध्ये "Not Paid" to "Paid" असा बदल आला आहे का याची खातरजमा करावी.** अशा "Send to Board" व "Paid" Status प्राप्त झालेली आवेदनपत्रे मंडळास प्राप्त झाले असे गृहीत धरून त्यावावत पुढील कार्यवाही करण्यात येईल. व उर्वरित आवेदनपत्रे Draft Mode मध्येच राहतील व त्यावावत कोणतीही कार्यवाही होणार नाही. त्याचप्रमाणे मंडळात रोख स्वरूपात शुल्क स्विकारले जाणार नाही.

५ माध्यमिक शाळांना भरलेल्या आवेदनपत्रांमधून निवड करून एक किंवा एकापेक्षा अधिक चलने तयार करता येतील. परंतु शुल्काचा भरणा करताना प्रत्येक चलन स्वतंत्रपणे भरण्यात यावे. जेणेकरून त्यात समाविष्ट विद्यार्थ्यांचे Status Update होईल.

६ आवेदनपत्रे सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क संगणकीय चलन Download करून चलनावरील virtual account मध्ये RTGS/NEFT द्वारे भरावयाचे आहे. माध्यमिक शाळांनी RTGS/NEFT द्वारे भरणा केलेली रक्कम त्यांच्या बँक खात्यातून प्रत्यक्ष वजा झाली आहे किंवा नाही तसेच account number व IFSC code बरोबर नमूद केला गेल्याम सदरची रक्कम परत त्यांच्या खात्यात जमा झाली आहे किंवा नाही याची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापकांची राहील.

७ माध्यमिक शाळांनी सादर केलेली सर्व आवेदनपत्रांचे विहीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय संबंधितांची प्रवेशपत्रे उपलब्ध करून दिली जाणार नाहीत.

८ विलंब शुल्काने आवेदनपत्रे सादर करण्याच्या तारखांना मुदतवाढ देण्यात येणार नाही. याची सर्व संबंधितांनी नोंद घेण्यात यावी.

(डॉ. दिपक माळी)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे–०४

क्र.मुंविमं/माध्य.परीक्षा/
वाशी, नवी मुंबई-४००७०३.
दिनांक - / /२०२

प्रति,
मुख्याध्यापक/ प्राचार्य
मुंबई विभागीय कार्यक्षेत्रातील
सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ट महाविद्यालये
मुंबई /बृहन्मुंबई /ठाणे /पालघर / रायगड जिल्हे

उपरोक्त पत्रानुसार मुख्याध्यापकांनी आपल्या स्तरावर नोंद घेवून त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

विभागीय सचिव,(प्र.)
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.

प्रतिः-
मुख्याध्यापक /प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा.

प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषितः-
१) मा. शिक्षण उपसंचालक, मुंबई.
२) शिक्षणाधिकारी(माध्य), ठाणे/रायगड/पालघर जिल्हा
३) शिक्षण निरीक्षक, पश्चिम/दक्षिण/उत्तर विभाग, मुंबई.
४) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, डहाणू/शहापूर/जव्हार/पेण.
यांनी आपल्या अधिपत्याखालील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांना परिपत्रक निदर्शनास आणावे.